आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
शनिवार, दिनांक ०४ मे २०२४

ठळक बातम्या

1. निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याचा प्रचार उद्या संपणार, सर्वपक्षीय प्रचाराला वेग.

2. केंद्र शासनाने कांद्यावरील निर्यात बंदी उठवल्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होणार - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

3. बुलढाणा जिल्ह्यात एसटी महामंडळाची बस आणि खाजगी बसच्या भीषण अपघातात १ महिला जागीच ठार तर २५ प्रवासी जखमी.

4. विदर्भात सलग तिसऱ्या दिवशी अकोला जिल्हा सर्वात उष्ण, उद्या कायम राहणार उष्णतेची लाट.

*****

तिसरा टप्पा/सभा

निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याचा प्रचार उद्या संपणार आहे. यात राज्यातल्या उस्मानाबाद, लातूर, रायगड, बारामती, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले या मतदारसंघांमध्ये सात मे रोजी मतदान होणार आहे. 'भाजपनं महिला आरक्षणासाठी अटी घातल्या आहेत. त्यामुळं ते २०३४ पर्यंत होणार नाही; पण इंडिया आघाडीचं सरकार आलं तर आम्ही दिल्लीपासून गल्लीपर्यंत, ५० टक्के महिला आरक्षण तातडीनं लागू करणार,' असं आश्वासन शिवसेना उद्धव बाळासाहेब गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी आज दुपारी रत्नागिरी जिल्ह्यातल्या चिपळूणमधल्या सभेत दिलं. महाविकास आघाडीचे रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातले उमेदवार आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते, विनायक राऊत यांच्या प्रचारासाठी त्यांची सभा झाली. कोल्हापुरात आज झालेल्या 'कॉफी विथ नीतिनजी' कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी गेल्या दहा वर्षातील यशस्वी प्रकल्पांची मालिका आपल्या मनोगतातून मांडली. आज सकाळी गडकरी यांनी श्रीमहालक्ष्मीचं दर्शन घेतलं. मतांच्या तुष्टीकरणासाठी फतवे काढून कुणी राजकारण करणार असेल तर त्याला जनता थारा देणार नाही. जनता 'वोट जिहादचे राजकारण' झुगारून देऊन, मतांची क्रांती करून राष्ट्रवादाला पाठबळ देईल असा विश्वास, उत्तरप्रदेशचे माजी उपमुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे प्रभारी खासदार, डॉ.दिनेशकुमार शर्मा यांनी व्यक्त केला. खासदार दिनेश शर्मा यांनी नगरदक्षिण आणि शिर्डी लोकसभा मतदार संघाचा दोन दिवस दौरा केला.

## जनजागृती मोहिम

लोकसभा निवडणुकीत मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी निवडणूक आयोगानं आतापर्यंतची सर्वात मोठी जनजागृती मोहिम हाती घेतल्याचं आयोगानं काल सांगितलं. विविध सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातल्या संस्थांनी या जनजागृती मोहिमेसाठी आयोगाला सहकार्य केलं आहे. निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात ६६ पूर्णांक १४ टक्के, तर दुसऱ्या टप्प्यात ६६ पूर्णांक ७१ टक्के इतकं विक्रमी मतदान झालं आहे, मात्र हे प्रमाण २०१९च्या सार्वत्रिक निवडणुकांच्या मतदानापेक्षा कमी आहे असंही निवडणूक आयोगानं सांगितलं.

## निवडणूक प्रतिनिधि

देशात सध्या सुरु असलेल्या लोकसभा निवडणूक प्रक्रियेचं निरीक्षण करून समग्र अनुभव घेण्याच्या दृष्टीनं २३ देशातल्या निवडणूक आयोगांचं ७५ प्रतिनिधी भारतात आले आहेत. या परदेशी पाहुण्यांना देखील लोकशाहीतल्या सर्वात महत्वाच्या पर्वाचं प्रत्यक्ष साक्षीदार होता यावं या उद्देशानं निवडणूक आयोगानं त्यांना आमंत्रित केलं आहे. हे सर्व प्रतिनिधी आयोगानं आयोजित केलेल्या सहा दिवसांच्या कार्यक्रमात सहभागी होणार असून, मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार आणि निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंग संधू उद्या त्यांच्याशी संवाद साधणार आहेत. हे सर्वजण महाराष्ट्र, गोवा, गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशला भेट देऊन मतदान प्रक्रियेचं निरीक्षण करणार आहेत.

## कांदा निर्यात बंदी

कांदा निर्यातीवरची बंदी केंद्र सरकारनं हटवली आहे. मात्र निर्यातीसाठी प्रति टन ५५० अमेरिकन डॉलर्स किमान भाव मिळणं आवश्यक राहील असं स्पष्ट केलं आहे. गेल्याच महिन्यात, केंद्र सरकारनं सहा मित्र देशांकडे, ९९ हजार मेट्रीक टन कांदा निर्यात करण्याची परवानगी दिली होती. दरम्यान, केंद्र शासनानं कांद्यावरील निर्यात बंदी उठवल्यामुळं कांद्याचे भाव वाढले असून, त्याचा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे. कांद्यावरील निर्यात बंदी उठवण्याच्या मागणीसाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही, उप-मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला होता त्यामुळेच हा निर्णय केंद्र सरकारला घ्यावा लागला असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज, नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना स्पष्ट केले. विरोधकांनी या प्रकरणी राजकारण केलं असल्याचा आरोप देखील त्यांनी यावेळी केला. केंद्र शासनानं कांदा निर्यात बंदी उठविल्याचं जाहीर केलं आहे त्यामुळं नाशिकमध्ये या निर्णयाचे शेतकरी वर्गानं स्वागत केलं आहे. निर्यात बंदी उठवताच जिल्ह्यातील प्रमुख बाजार समित्यांमध्ये कांद्याचे भाव वाढले आहेत. लासलगाव कांदा बाजारपेठेत ६०० ते १,५०० जास्तीत जास्त

रुपये क्विंटल असणारे भाव आज शनिवारी तेजीत आले आणि ७५० रुपये भावात तेजी आली.

<u>आश्रम शाळा</u>

आश्रम शाळातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक उपक्रमासोबत बौध्दिक विकासाला चालना देण्यासाठी, हार्टफुलनेस फाउंडेशनच्या वतीनं ब्राईटर माइंडचे प्रशिक्षण, ९० विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे पूर्ण केले आहे. विद्यार्थ्यांच्या बौध्दिक विकासाला चालना देणारा हा उपक्रम आदिवासी विकास विभागाच्या सर्वच शाळांमध्ये प्राधान्यानं राबविण्यात येईल असं प्रतिपादन, आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्त, रविंद्र ठाकरे यांनी केलं. गिरीपेठ इथल्या आदिवासी विकास भवन इथ आश्रम शाळातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित, ब्राईटर माइंड प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना ठाकरे बोलत होते.

<u>मोबाइल बॅटरी</u>

भंडारा इथल्या जिल्हा कारागृहात, मकोकाच्या आरोपाखाली बंदिस्त असलेल्या एका कैद्यानं आपल्या बराकी लगतच्या शौचालयातील भिंतीमध्ये छिद्र करून मोबाइलच्या चार बॅटरी लपविल्याचं प्रकरण पुढे आलं आहे. एवढेच नाही, तर त्याच्या बराकी समोरील जागेतून, चालू स्थितीतील एक मोबाइलही जप्त करण्यात आला आहे. या घटनेमुळं कारागृह प्रशासनात खळबळ उडाली आहे. जुल्फेकार असं या आरोपीचं नाव असून, तो गोंदियातील रहिवासी आहे. याप्रकरणी त्याच्या विरूद्ध शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

<u>‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’</u>

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण मावळ लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वासात ते साडेसात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<u>अपघात</u>

बुलडाणा जिल्ह्यात चिखली-मेहकर मार्गावर, एसटी आणि एका खाजगी बसला आज झालेल्या अपघातात, एका महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर २५ प्रवासी जखमी झाले. जखमींपैकी सहा जणांची प्रकृती अतिशय गंभीर असून, त्यांना उपचारासाठी मेहकर इथल्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. महामंडळाच्या एस.टी.बसला ओव्हरटेक

करण्याच्या प्रयत्नात, खाजगी बस चालकाला वाहनाचा अंदाज न आल्यानं ही दुर्घटना घडली.

गंगाधर गाडे निधन

माजी राज्यमंत्री आणि पँथर्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष, गंगाधर गाडे यांचं आज पहाटे छत्रपती संभाजीनगर इथं निधन झालं. ते ७६ वर्षांचे होते. संभाजी नगरातल्या नागसेन विद्यालयाच्या प्रांगणात उद्या दुपारी १२ ते ४ या वेळेत त्यांचं पार्थिव, अंत्यदर्शनसाठी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर विद्यालयाच्या परिसरातच त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.

खामगाव-जलंब जंक्शन

तब्बल १७५ वर्षापासून सुरू असलेली बुलडाणा जिल्हयातील, खामगाव-जलंब जंक्शन रेल्वे शटल सेवा पुन्हा एकदा पूर्ववत झाली असून, खामगाव ही पूर्वीपासूनच चांदी आणि कापसाची बाजारपेठ आहे. त्यामुळं खामगाव इथून संपूर्ण देशभरात कापसाच्या गाठी वाहतूक करण्यासाठी, इंग्रजांनी खामगाव इथून कलकत्ता-मुंबई या मेन रेल्वेलाईनला जोडणारी १४ किलोमीटरची शटल सेवा सुरू केली होती. पूर्वी ही शटल सेवा कोळशावर चालणाऱ्या इंजिन वर सुरू होती, काही काळानंतर याचं रूपांतर रेल्वे बस मध्ये करण्यात आलं, मात्र आता खामगाव रेल्वे स्थानकाचा विस्तारीकरण केल्यानंतर आणि विद्युतीकरण केल्यानंतर कोरोना काळापासून बंद असलेली ही शटल सेवा, काल रात्रीपासून सुरू करण्यात आली. या शटल सेवेचे जलंब ते खामगाव अशा दिवसातून चार फेऱ्या होणार आहेत त्यामुळं या परिसरात राहणाऱ्या शेतकरी, कामगार, विद्यार्थी आणि प्रवाशांची मोठी सोय झाली आहे.

टँकरद्वारे पाणीपुरवठा

बुलढाणा जिल्ह्यात ४७ गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असून जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई असल्यानं प्रशासनानं १६८ विहिरी आरक्षित केलेल्या असून, एक लाख ४४ हजार ६४० नागरिकांना, टँकरद्वारे जिल्हा प्रशासनाकडून पाणीपुरवठा सुरू आहे. दरम्यान, बुलडाणा जिल्ह्यात लग्नसराईचा जोर सुरू आहे मात्र यामध्ये लग्नसराई मोठ्या प्रमाणावर कर्कश आवाजाच्या डिजे वाद्य मालकांवर त्यांनी कारवाई केली असून, तब्बल सहा लाख रुपयांचा दंड ठोठविण्यात आला आहे.

हवामान हिटवेव

आगामी काही दिवस राज्यासह विदर्भात उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. मागील २४ तासांत विदर्भात सर्वाधिक तापमान अकोला इथं ४३.४ अंश सेल्सियस इतकं नोंदविण्यात आलं. त्या पाठोपाठ गडचिरोली, चंद्रपूर, वाशिम, वर्धा आणि अमरावती इथं तापमान ४२ अंशाच्या घरात असून, नागपूर, भंडारा, गोंदिया, बुलढाणा या जिल्ह्यात तापमान ३९ ते ४० अंश दरम्यान आहे. यवतमाळ इथं आज ४१ अंश सेल्सियस तापमान होतं. अकोला जिल्ह्यात आज आणि उद्या उष्णतेचा येलो अलर्ट जारी करत, उष्णतेच्या लहरीचा इशारा देण्यात आला आहे. वाढते तापमान लक्षात घेता भंडारा जिल्हा सामान्य रूग्णालयात उपाय योजनेच्या दृष्टीनं सुसज्ज, उष्माघात कक्ष सुरू करण्यात आल आहे. भंडारा इथल्या जिल्हा रुग्णालयात कोरोना ब्लॉक या नवीन इमारतीत प्रभाग क्रमांक नऊ आणि तेरामध्ये प्रत्येकी चार खाटांचा उष्माघात कक्ष सुरू करण्यात आला आहे. तापमान सातत्यानं वाढणार असल्यानं भरपूर पाणी पिणे, दुपारी आवश्यक नसल्यास उन्हात बाहेर न पडणे, स्कार्फ-दुपट्टा यांचा वापर आवर्जून करणे अश्या विविध उपाय योजना प्रशासनाच्या आरोग्य विभागानं सुचविल्या आहेत.

प्रारंभ"

नोकरी घेणारे बनण्यापेक्षा नोकरी देणारे व्हा, असं आवाहन कुलगुरू डॉ.मिलींद बारहाते यांनी विद्यार्थ्यांना केलं. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन आणि इनोव्हेशन, इन्क्युबेशन ॲन्ड लिंकेजेसच्या संयुक्त विद्यमानं विद्यापीठात विद्यार्थ्यांसाठी "प्रारंभ" नामक प्रभावी कार्यक्रमाचं आयोजन प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. प्रमुख अतिथी आशिष सावजी यांनी मार्गदर्शन करतांना सांगितलं की महाराष्ट्र इंडस्ट्रियल असोसिएशन विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी सदैव तत्पर राहील. विद्यार्थ्यांना नवनवीन कल्पना याव्या, याकरिता अशा प्रकारचे उपक्रम राबवावेत असं आवाहन त्यांनी केलं.

*****